<u>नि.फौ.खटला क्र. १४००१५१/२००४</u>
<u>सरकार वि. सियाराम</u>
<u>निशाणी क्र. ११ खाली</u>

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष शपथेवर सुरु :-(२९९ फौ. प्रक्रिया अंतर्गत जबाब)</u>**

<u>नाव</u> : निलम सत्यानंद तिवारी,
<u>वय</u> : ५१ वर्ष, <u>कामधंदा</u> : मजुरी,
<u>राहणार</u> : वार्ड नं. १, मनसर, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.

मी यातील फिर्यादीला ओळखत नाही. घटना कधी व कशी घडली याबाबतही मला काही माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षाला सहयोग करीत नसल्यामुळे उलट तपासाच्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**

हे म्हणणे खरे नाही की, दि ८/५/२००४ रोजी सकाळी ९ ते ९.३० वाजताच्या दरम्यान मी सहानी यांची विटभट्टी पाहण्याचे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मोतीलाल त्याच्या विटभट्टीमध्ये विटा बनविण्याकरीता माती टाकत होता व त्याचा मुलगा धर्मदास तेव्हा त्याच्या बाजूला उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मुंशी सियाराम तेथे आला आणि फिर्यादीला 'तुझा मुलगा मातीत गोटे टाकत आहे' असे म्हणाला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने फिर्यादीच्या मुलाला विटेचा तुकडा फेकून मारल्याने त्याच्या नाकाला व कपाळाला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>जबाब पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

सही/-

रामटेक.

(ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २७/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक.

नि.फौ.खटला क्र. १४००१५१/२००४
सरकार वि. सियाराम
निशाणी क्र. १२ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ ची साक्ष शपथेवर सुरु :–(२९९ फौ. प्रक्रिया अंतर्गत जबाब)**

नाव : हरीशचंद्र दिनबाजी नारनवरे,
वय : ४९ वर्ष, कामधंदा : शेती,
राहणार : खुमारी, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.

मी यातील फिर्यादी आणि आरोपीला ओळखत नाही. घटना कधी व कशी घडली याबाबतही मला काही माहिती नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षाला सहयोग करीत नसल्यामुळे उलट तपासाच्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे आहे की, दि ८/५/२००४ रोजी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान मी सहानी यांची विटभट्टी पाहण्याचे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मोतीलाल हा सहानी याच्या विटभट्टीमध्ये विटा बनविण्याकरीता माती टाकत होता व त्याचा मुलगा धर्मदास तेव्हा त्याच्या बाजूला उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मुंशी सियाराम तेथे आला आणि फिर्यादीला 'तुझा मुलगा मातीत गोटे टाकत आहे' असे म्हणाला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने फिर्यादीच्या मुलाला विटेचा तुकडा फेकून मारल्याने त्याच्या नाकाला व कपाळाला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>जबाब  पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

सही/-

रामटेक. (ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २७/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक.

नि.फौ.खटला क्र. १४००१५१/२००४
सरकार वि. सियाराम
निशाणी क्र. १३ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ ची साक्ष शपथेवर सुरु :–(२९९ फौ. प्रक्रिया अंतर्गत जबाब)**

नाव : अनिल फुलचंद घोडेस्वार,
वय : ५० वर्ष, कामधंदा : पोलीस शिपाई (बॅच नं. १२७६),
राहणार : रामटेक पोलीस स्टेशन, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.

नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक १४०१५१/२००४ मधील साक्षी समन्स आणि आरोपीचे पकड वॉरंट माझ्याकडे बजावणी करता देण्यात आले होते. मी समन्स आणि वॉरंट वरील नमूद पत्त्यावर जाऊन पहिले असता मी तेथे उपस्थित असलेल्या मॅनेजरने सांगितले की, २० वर्षांपूर्वी त्या वेळच्या ठेकेदाराकडून कामाला आले होते व ते काम झाल्यानंतर निघून गेले व पुन्हा कधीही आले नाहीत. फिर्यादी देखील त्यातील मजूरच होता. प्रकरणातील दोन साक्षीदार यांचे साक्ष समन्स बजावले व इतर कोणतेही साक्षीदार मिळून आले नाहीत.

**जबाब पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,
सही/–
रामटेक. (ए. ए. शिरवळकर)
दिनांक : २७/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक.